# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, गुरुवार, दिनांक २९ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३३६ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## विशेष संपादकीय

### मुख्यमंत्री अजितदादा, अलविदा...!

संदीप काळे

अनेकांना अजितदादा यांच्यासाठी वापरलेला मुख्यमंत्री हा शब्द कदाचित तांत्रिकदृष्ट्या नक्कीच खटकेल, पण हा वास्तवाचा आरसा काही वेगळाच होता. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना कोरोनाच्या त्या भीषण काळात प्रशासनाची सर्व सूत्रे अजितदादांच्या हातात होती. मंत्रालयातील अनेक बैठकांना पत्रकार म्हणून उपस्थित राहण्याचा योग आला, तेव्हा जाणवायचे की, अजितदादाच मुख्यमंत्री म्हणून सर्व जबाबदारी समर्थपणे पेलत आहेत. सहा वेळा उपमुख्यमंत्री राहिलेला हा माणूस या राज्याचा लोकनियुक्त मुख्यमंत्री व्हावा, अशी इच्छा महाराष्ट्रातील प्रत्येक कार्यकर्ते, समाजाच्या मनात होती. पण सत्तेच्या पदापलीकडे जाऊन गेल्या तीन टर्ममध्ये दादांची कार्यपद्धती एखाद्या मुख्यमंत्र्याला साजेशीच होती. त्यांना केवळ 'मुख्यमंत्री' असे पद मिळाले नाही काय ते एवढेच.

दादा नाही,आज हे सर्व लिहिताना लेखणी जणू थबकते आहे. केवळ मुख्यमंत्री पद नव्हे, तर देशाच्या राजकारणात सक्षम नेतृत्व करण्याची धमक असणारा हा दादा माणूस आज महाराष्ट्राला पोरका करून गेला. त्यांच्याशी जोडलेल्या ऐतिहासिक स्मृती आणि आठवणींचा 'महासागर' समोर उभा आहे. तो थट्टा-मस्करीकरणारा, स्पष्ट बोलणारा आणि प्रत्येकाचे प्रश्न तडीला नेणारा अजितदादा नावाचा माणूस आता पुन्हा होणे नाही, हेच दाहक सत्य आहे.

मला आजही आठवते, मी आणि पत्रकार चेतन बंडेवार बारामतीला होणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या पत्रकार अधिवेशनासंदर्भात दादांना भेटायला गेलो होतो. पहिल्याच भेटीत दादांनी स्पष्ट सांगितले, ''नियोजन समोर ठेवा आणि मगच चर्चेला बसा.'' दुसऱ्या भेटीत आम्ही बारामतीला गेलो. नियोजनाचा आराखडा मांडला. बैठकीच्या सुरुवातीलाच त्यांनी त्यांचे खाजगी सचिव हनुमंत पाटलांना विचारले, ''मुंबईहून आलेल्या पाहुण्यांच्या जेवणाचं काय?'' त्यांच्या आदरातिथ्याचा तो ओलावा आजही आठवतो. जेवण झाल्यावर पुन्हा बैठक सुरू झाली. प्रत्येक विषयातील त्यांचा बारकावा, हवा असलेला संदर्भ आणि ''बारामतीला येणारी पत्रकार मंडळी इथलं वैभव पाहून गेली पाहिजेत,'' हा त्यांचा आग्रहीपणा थक्क करणारा होता.

कार्यक्रमाच्या अगोदर आम्ही जेव्हा त्यांना मलबार हिलच्या बंगल्यावर भेटायला गेलो, तेव्हा माझ्या आणि चेतन यांच्या हातातील पुष्पगुच्छ पाहून दादा आपल्या खास शैलीत म्हणाले होते, ''हा पुष्पगुच्छ लाखांमध्ये राहू द्या, कोटींमध्ये जाऊ देऊ नका!'' त्यांच्या या मिश्किल टिप्पणीने वातावरणात एकच हशा पिकला. छोट्या गोष्टीला विनोदाची झालर लावत प्रत्येकाला न्याय मिळेल याची खबरदारी घेणे आणि जे शक्य नाही त्याला नाही म्हणण्याचे नैतिक धाडस दाखवणे, ही दादा स्टाईल फक्त त्यांच्याकडेच होती.

बारामतीच्या अधिवेशनानंतर चार दिवसांनी दादा आणि सुनेत्रा पवार यांनी आम्हाला मलबार हिलच्या बंगल्यावर घरी जेवायला बोलावले. जेवण झाल्यावर दादांनी एक कागद माझ्या हातात देत ते म्हणाले, हे पाहा ''बारामतीच्या अधिवेशनावर झालेला खर्च मी माझ्या वैयक्तिक खिशातून केला आहे, हे तुम्हाला सांगायचे होते, आणि तुम्ही काम चांगले केले, त्याबद्दल तुमचे अभिनंदन करायचे होते, म्हणून तुम्हाला जेवायला बोलावले. दादाचे ते बोलणे ऐकून आम्ही एकदम शांत झालो. नाहीतर नेहमी राजकीय मंडळी त्यांच्यावर आलेले आर्थिक ओझे दुसऱ्यावर टाकतात, हे नवे नाही.

दादांच्या पुढाकारातून पुण्यात 'सारथी' हा उपक्रम सुरु झाला आणि अशोक काकडे नावाच्या अधिकाऱ्याने दादांचे स्वप्न साकार केले. 'सारथी'ने बहुजनांच्या शेकडो मुलांना लाल दिव्याची गाडी दिली. असे अनेक उपक्रम दादांच्या नावे आहेत ज्यांचा इतिहास झाला आहे.

''दादांच्या पारदर्शकतेला आणि प्रामाणिकपणाला कोणीही आव्हान देऊ शकत नाही. राजकारणात ते जितके कणखर होते, तितकेच आपल्या माणसांच्या बाबतीत हळवे आणि निष्ठावंत होते. ज्यांना दादा कळाले, ते त्यांच्यासोबत सावलीसारखे राहिले आणि ज्यांना त्यांचा फटकळपणा किंवा कामाचा फॉलोअप झेपला नाही, ते दूर गेले. जे दूर गेले तेही आज दादांच्या जाण्याच्या वार्तेने ढसाढसा रडताना आपण पाहिले.

दुसरा एक किस्सा त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची साक्ष देतो. माझ्या पुण्यातील सारथीवरील विजयी भव पुस्तकाचे प्रकाशन पुण्यातील सारथीच्या सभागृहात दादांच्या हस्ते झाले. सकाळी आठची वेळ असूनही सभागृह खचाखच भरले होते. दादांनी भाषणात पुस्तकाचे खूप कौतुक केले. दादा कार्यक्रमातून बारामतीला गेले. कार्यक्रमानंतर दीड तासांनी मला दादांचा फोन आला. ते म्हणाले, संदीप पुस्तक फार छान झाले, ''जसे सारथीवर हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेत पुस्तक केले, तसेच पुस्तक बारामतीमधील कलाशिल्पांवर आणि नवनवीन वास्तूंवर लिहून द्याल का?'' मी आनंदाने होकार दिला. प्रत्येक गोष्टीला हेरायचे, त्यात बारकावे शोधायचे आणि ते समाजोपयोगी कसे ठरतील यासाठी पुढाकार घ्यायचा, हा दादांचा हातखंडा होता.

प्रशासनात आणि पक्षात त्यांचा असलेला दरारा कमालीचा होता. संपूर्ण राष्ट्रवादी पक्ष समर्थपणे चालवून महाराष्ट्राच्या सत्तेच्या चाव्या आपल्या हाती असाव्यात, ही त्यांची इच्छा अखेरपर्यंत 'अधुरीच' राहिली. त्यांनी दुसरा राष्ट्रवादी पक्ष उभा केला, पण मनातील दुफळीची सल त्यांना कायम टोचत राहिली. ज्या कार्यकर्त्यांनी आपली हयात एकाच विचारात घालवली आणि केवळ दादांच्या शब्दाखातर ते त्यांच्यासोबत आले, त्यांच्या आयुष्यात दादांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या निमित्ताने संजय मिस्कीन सारख्या अनेक निष्ठावान ज्येष्ठ पत्रकारांचे,मोठे पदाधिकारी यांचे चेहरे माझ्या समोर येत आहेत. यांचे आता पुढे काय होणार? जे समाजासाठी, पक्षासाठी 'दादामय' होते, असा प्रश्न पडतोय. अख्खा राष्ट्रवादी पक्ष आपल्या खांद्यावर असावा आणि त्याच पक्षाच्या माध्यमातून

काळानुरूप त्यांनी स्वाभिमानी विचारांचा दुसरा राष्ट्रवादी पक्ष उभा केला खरा, पण घरातील आणि पक्षातील, युतीमधील दुफळीचे शल्यत्यांच्या मनाला कायम बोचत राहिली. दुसरा महत्वाचा विषय म्हणजे 'मुख्यमंत्रीपद'! सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री राहिलेला हा माणूस आज ना उद्या राज्याचा मुख्यमंत्री होईल, हे स्वप्न उराशी बाळगून जगणाऱ्या त्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या मनातील वेदना आज शब्दांत मांडता येणार नाहीत. ज्यांनी आपली उभ्या आयुष्याची कमाई एका पक्षासाठी खर्च केली आणि केवळ दादांच्या एका शब्दाखातर नव्या वाटेवर चालले, त्यांच्या राजकीय प्रवासाचा या घटनेने जणू 'अश्वत्थामा' झाला आहे.

उद्या काय होईल? पार्थ पवार यांच्याकडे पक्षाची धुरा येईल? दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा सुतळीसारख्या एकत्र विणल्या जातील? शरद पवार निवृत्ती जाहीर करून आता भांडू नका, हे सूत्र तुम्ही सांभाळा असे म्हणतील? सुप्रियाताई कडे केंद्राची पूर्ण जबाबदारी येईल? हे सगळे जर-तरचेखेळ आज गौण वाटतात. सत्य हेच आहे की, आज महाराष्ट्र एका अशा नेतृत्वाला मुकला आहे, ज्याची जरब आणि प्रशासकीय पकड प्रत्येकाला हवीहवीशी वाटत होती. आज केवळ बारामती पोरकी झाली नाही, तर मुख्यमंत्र्यांच्याही दोन पावले पुढे जाऊन अहोरात्र काम करणारा एक शिस्तबद्ध कर्मयोगी गेल्यामुळे देशाच्या राजकारणातही एक रितेपण आणि नैराश्य दाटून आले आहे.

विखुरलेली राष्ट्रवादी पुन्हा एकसंध होऊन त्याच जोमाने कार्य करेल, हीच आता अपेक्षा आहे. ज्या उदात्त भावनेने आणि ध्येयाने अजितदादांनी महाराष्ट्रासाठी स्वतःला झिजवले, तेच कार्य पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. ज्या ज्या कार्यकर्त्यांना, नेत्यांना दादांनी राजकारणात शब्द दिला होता, त्या प्रत्येक शब्दाचा सन्मान राखला जाणे आणि त्यांच्या वारशाचा योग्य गौरव होणे, यातच त्यांच्या आत्म्याचे समाधान असेल. माणूस किती काळ जगला यापेक्षा, तो आपल्या स्वाभिमानासाठी आणि माणसांसाठी कसा जगला, यालाच इतिहास साक्ष देतो. अजितदादांनी आपल्या कर्तृत्वाने तो इतिहास सुवर्ण अक्षरात कोरला आहे.

आता जर-तरच्यागोष्टी करण्यात अर्थ नाही. भविष्यात काय होईल, कोण पक्षाची कमान सांभाळेल, हे काळच ठरवेल. पण आज हा महाराष्ट्र अशा एका माणसाला मुकला आहे, ज्याचे कणखर नेतृत्व प्रत्येकाला हवेहवेसे वाटत होते. आज केवळ बारामती किंवा महाराष्ट्रच पोरका झाला नाही, तर देशाच्या राजकारणात एक शिस्तबद्ध आणि कर्तृत्ववान अध्याय संपल्याने कमालीची उदासीनता दाटून आली आहे.

माणूस किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला आणि माणसांसाठी किती जगला, यालाच खरे महत्त्व आहे. अजितदादा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत एखाद्या वाघासारखे जगले. राजकारणातील हा मोठा दादा आज गेला असला, तरी समाजकारणावर असलेला त्यांचा धबधबा सदैव कायम राहील.

अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली...!

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे मुख्य समूह संपादक, आहेत.)

# दादा गेले

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन

## महाराष्ट्र गहिवरला, कार्यकर्त्यांना अश्रू अनावर

**वृत्तसंस्था**
**बारामती, दि. २८**

महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या धडाडीच्या निर्णयांनी आणि प्रशासनावरील पकडीने ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आज (२८ जानेवारी) बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. राज्याच्या सत्ताकारणातील एक महत्त्वाचा स्तंभ निखळल्याने अवघ्या महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत आपल्या होमपिचवर निघालेल्या दादांना काळाने अचानक हिरावून घेतल्याने राजकीय वर्तुळात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**विमान लँडिंगदरम्यान घात झाला?**

मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी अजित पवार आज सकाळी बारामती दौऱ्यासाठी निघाले होते. बारामती विमानतळावर विमान लँडिंग होत असतानाच तांत्रिक बिघाड झाल्याने विमानाला भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की विमानाचे अक्षरशः तुकडे झाले. विमानात अजित पवारांसह अन्य ६ जण उपस्थित होते. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली, मात्र जखमींची अवस्था पाहूनच सर्वांच्या काळजाचा ठोका चुकला होता.

**उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली**

गंभीर जखमी अवस्थेत अजित पवार यांना तात्काळ बारामतीमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या पथकाने शर्थीचे प्रयत्न केले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. ''सकाळी ५ वाजता उठून प्रशासनाचे काम सुरू करणारा एक लोकनेता आज शांत झाला,'' अशी भावना व्यक्त करताना बारामतीकरांना अश्रू अनावर झाले आहेत.

**राजकीय दादागिरीचा अंत; साडेचार दशकांचे नेतृत्व हरपले**

अजित पवार हे केवळ एक उपमुख्यमंत्री नव्हते, तर ते राष्ट्रवादी काँग्रेसचे एक खंबीर नेतृत्व आणि राज्याच्या प्रशासनाचा कणा होते.

**प्रशासनावरील पकड:** फाईल्सचा तातडीने निपटारा आणि अधिकाऱ्यांवर असलेला वचक ही त्यांची ओळख होती.

**पवार कुटुंबाचा आधार:** शरद पवारांचे वारसदार म्हणून राजकारणात प्रवेश केल्यापासून त्यांनी स्वतःचा वेगळा ठसा उमटवला होता.

**निवडणूक रणनीती:** सध्या राज्यात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अजित पवार हे महायुतीचे मुख्य रणनीतीकार होते. त्यांच्या जाण्याने महायुतीसह पवार कुटुंबाला मुळापासून हादरा बसला आहे.

तपास यंत्रणा आणि राजकीय प्रतिक्रिया हा केवळ अपघात आहे की तांत्रिक दोष? याचा तपास आता उच्चस्तरीय यंत्रणांकडून केला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांनी तातडीने बारामतीकडे धाव घेतली आहे. राज्याच्या राजकारणातील हा झंझावात आता शांत झाला असला, तरी त्यांनी निर्माण केलेले दादा पर्व महाराष्ट्राच्या इतिहासात सदैव स्मरणात राहील.



याच विमानात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाला.

### आज अंत्यसंस्कार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार पार पडणार आहेत. बारामती तालुका पो. स्टे. हद्दीतील विद्या प्रतिष्ठाण येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती सूत्राने दिली आहे. अंत्यदर्शनासाठी पवार यांचे पार्थिव शारदा प्रांगणात ठेवण्यात आला आहे. अंत्यसंस्काराला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा उपस्थित राहण्याची शक्यता असल्याचे सूत्राने स्पष्ट केले. त्यादृष्टीने पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री बारामतीकडे रवाना**

या दुःखद घटनेची माहिती मिळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले आजचे नियोजित सर्व कार्यक्रम तातडीने रद्द केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघेही थोड्याच वेळात विशेष विमानाने बारामतीकडे रवाना होत आहेत. अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार बारामती येथे होण्याची शक्यता असून, तिथे संपूर्ण राज्य मंत्रिमंडळ उपस्थित राहण्याची चिन्हे आहेत.

**३ दिवसांचा राजकीय दुखवटा**


दिवंगत नेत्याच्या सन्मानार्थ संपूर्ण महाराष्ट्रात २८ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत तीन दिवसांचा राजकीय दुखवटा पाळला जाईल.

राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकणार: या तीन दिवसांच्या काळात ज्या शासकीय इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकवला जातो, त्या सर्व इमारतींवरील ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात येतील.

आज शासकीय सुट्टी जाहीर: उपमुख्यमंत्री महोदयांच्या निधनामुळे आदरांजली म्हणून आज, बुधवार २८ जानेवारी २०२६ रोजी, राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये बंद ठेवण्याची घोषणा करण्यात आली आहे.

मनोरंजन कार्यक्रमांवर बंदी: या शोककाळात कोणताही अधिकृत किंवा शासकीय मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित केला जाणार नाही.

### अजितदादा पवार: राजकीय प्रवास आणि वैशिष्ट्ये



१. जन्म आणि कुटुंब: २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील देओली येथे जन्म.

२. शिक्षण: त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या मूळ गावी आणि माध्यमिक शिक्षण मुंबईत झाले. त्यांनी बी.कॉम. पर्यंत शिक्षण घेतले आहे.

३. राजकीय सुरुवात: १९८२ मध्ये एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला.

४. सहकारी संस्थांवर पकड: पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकमध्ये त्यांनी दीर्घकाळ अध्यक्ष म्हणून काम पाहिले आणि बँकेला मोठी उंची मिळवून दिली.

५. संसदीय कारकीर्द: १९९१ मध्ये ते पहिल्यांदा बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून गेले होते.

६. त्याग आणि निष्ठा: शरद पवार पी.व्ही. नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण मंत्री झाले तेव्हा अजितदादांनी त्यांच्यासाठी खासदारकीचा राजीनामा दिला.

७. आमदारकीचा विक्रम: १९९१ पासून २०२४ पर्यंत ते सलग ८ वेळा बारामती विधानसभा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने निवडून आले.

८. राज्यमंत्री पद: १९९१ मध्ये सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी पहिल्यांदा कृषी आणि ऊर्जा राज्यमंत्री म्हणून काम पाहिले.

९. जलसंपदा क्षेत्रातील काम: जलसंपदा मंत्री म्हणून काम करताना त्यांनी राज्यात सिंचनाचे जाळे पसरवण्यासाठी अनेक मोठे प्रकल्प हाती घेतले.

१०. वक्तशीरपणा: अजितदादा त्यांच्या शिस्तीसाठी प्रसिद्ध होते. पहाटे ६७ वाजता कामाला सुरुवात करणे आणि मंत्रालयात वेळेवर पोहोचणे ही त्यांची ओळख होती.

११. उपमुख्यमंत्री पदाचा विक्रम: महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक वेळा (६ वेळा) उपमुख्यमंत्री होण्याचा बहुमान त्यांना मिळाला.

१२. प्रशासकीय पकड: अधिकारशाहीवर त्यांची जबरदस्त पकड होती, ज्यामुळे ''दादांनी शब्द दिला की काम होणारच'' अशी त्यांची जनमानसात प्रतिमा होती.

१३. अर्थमंत्री म्हणून भूमिका: अनेक वर्ष राज्याचे अर्थमंत्री म्हणून काम करताना त्यांनी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प प्रभावीपणे मांडला.

१४. २०१९ चा पहाटेचा शपथविधी: २३ नोव्हेंबर २०१९ रोजी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती, जो भारतीय राजकारणातील सर्वात चर्चेचा विषय ठरला.

१५. महाविकास आघाडी: त्यानंतर लगेचच स्वगृही परतून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

१६. विरोधी पक्षनेते: २०२२ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर त्यांनी विधानसभा विरोधी पक्षनेते म्हणून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले.

१७. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट: २ जुलै २०२३ रोजी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मोठ्या गटासह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील होण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

१८. पक्षाध्यक्ष आणि चिन्ह: कायदेशीर लढाईनंतर निवडणूक आयोगाने त्यांचा गट हीच मूळ राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचे मान्य करून त्यांना घड्याळ चिन्ह दिले.

१९. विकासकामांचा ध्यास: बारामतीचा कायापालट करून तिथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते.

२०. कार्यसम्राट नेता: स्पष्टवक्तेपणा आणि कडक स्वभाव असूनही, कार्यकर्त्यांच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणून त्यांची सर्वपक्षीय ओळख होती.

### सकाळी ५ चा अलार्म अन्? प्रशासनाचा पावरफुल वचक


**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २८**

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नेते आले आणि गेले, पण ज्यांच्या नावाचा दरारा मंत्रालयातील सहाव्या मजल्यापासून ते गावच्या चावडीपर्यंत सारखाच आहे, असे एकमेव नाव म्हणजे अजित पवार. ''कामाशी काम आणि शब्दाला पक्का'' ही त्यांची ओळख केवळ राजकीय घोषणा नव्हती, तर ती त्यांची जगण्याची पद्धत होती. साडेचार दशकांचा त्यांचा प्रवास हा संघर्षाचा, धाडसाचा आणि अफाट कार्यक्षमतेचा इतिहास आहे.

अजित पवारांची कार्यशैली ही कोणत्याही कॉर्पोरेट मॅनेजरला लाजवेल अशी होती. पहाटेचे दादा: महाराष्ट्राने अनेकदा पाहिले आहे की, जेव्हा अवघा देश झोपलेला असतो, तेव्हा अजित पवार फाईल्सचा निपटारा करत असतात किंवा प्रकल्पांच्या जागेवर जाऊन पाहणी करत असतात. सकाळी ७ वाजता अधिकाऱ्यांची बैठक घेणे हा त्यांचा शिरस्ता होता.

### राष्ट्रपती मुर्मू आणि पंतप्रधान मोदी यांना शोक





**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. २८**

महाराष्ट्रातील बारामती येथे झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ६ लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अकाली निधन हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे. अजित पवार हे महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकार क्षेत्रात दिलेल्या विशेष योगदानाबद्दल नेहमीच लक्षात राहतील. मी त्यांच्या कुटुंबियांना, समर्थकांना आणि चाहत्यांना माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करते. या अपघातात जीव गमावलेल्या इतर सर्वांच्या कुटुंबियांना हा धक्का सहन करण्याची शक्ती देवो, असे त्या म्हणाल्या.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे जनतेशी घट्ट नाते असलेले, तळागाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबाप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती मनःपूर्वक शोक संवेदना व्यक्त केल्या आहेत.

### कालची दादांची आणि माझी शेवटची भेट -बावनकुळे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २८**

पायाभूत सुविधा समितीच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी मुख्यमंत्री मा. _ जी यांच्यासमवेत आम्ही सर्व उपस्थित होतो. नेहमीप्रमाणे दादांचा आत्मविश्वास, मिश्कीलपण आणि कामावरील पकड तशीच होती. कोणालाही कल्पना नव्हती की ती भेट शेवटची ठरणार आहे.

आजही दादांच्या नसण्याची कल्पना मनाला मान्य होत नाही. क्षणोक्षणी वाटत राहते आता दादांचा फोन येईल, एखाद्या मुद्द्यावर ठाम शब्दांत चर्चा करतील, नेहमीसारखं हसत म्हणतील, ''चला, कामाला लागूया.''

दादा आपली ही धक्कादायक एक्झिट आम्हाला मान्य नाही. महाराष्ट्राच्या विकासासाठी अखंड झटणारा, निर्णयक्षम नेतृत्वाचा आधार अचानक हरपल्याची पोकळी शब्दांत मांडता येणार नाही. तुमची आठवण नेहमी येईल, तुमची उणीव नेहमी जाणवत राहील.

### बारामतीतील त्या ४ सभांचे अधुरे स्वप्न!

**वृत्तसंस्था**
**बारामती, दि. २८**

ज्या बारामतीच्या मैदानातून राज्याच्या राजकारणाची सूत्रे हलवली जातात, त्याच बारामतीच्या मातीत आज एक अघटित घडले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आजच्या दिवशी बारामतीमध्ये झंझावाती प्रचाराचे रणशिंग फुंकणार होते. सभेची मैदाने सजली होती, लाऊडस्पीकरवर दादांच्या आगमनाच्या घोषणा होत होत्या, मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. आजच्या या शेवटच्या दौऱ्यात नक्की काय नियोजन होते आणि अजित पवार कोणाला भेटणार होते? याचा हा विशेष अहवाल.

अजित पवार हे केवळ नावाचेच वेळ पाळणारे नेते नव्हते, तर आजच्या दौऱ्याचे नियोजनही त्यांनी मिनिटा-मिनिटाच्या हिशोबात आखले होते. काल रात्री उशिरापर्यंत मंत्रालयात पायाभूत सुविधा समितीची बैठक घेऊन त्यांनी मुंबईच्या विकासाचे अनेक मार्ग मोकळे केले होते. त्यानंतर आज सकाळी ८ वाजता त्यांनी बारामतीतील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारासाठी प्रस्थान केले होते.

आज बारामती तालुक्यात अजित पवारांच्या चार मोठ्या जाहीर सभा होणार होत्या. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सभांना विशेष राजकीय महत्त्व होते:

**पहिली सभा (सुपे):** सकाळी ११ वाजता सुपे जिल्हा परिषद गटात त्यांची पहिली तोफ धडाडणार होती. या ठिकाणी ते स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधणार होते.

**दुसरी आणि तिसरी सभा:** दुपारच्या सत्रात ग्रामीण भागातील दोन महत्त्वाच्या केंद्रांवर त्यांनी उमेदवारांच्या प्रचारासाठी वेळ दिला होता.

**सांगता सभा (बारामती शहर):** संध्याकाळी ५:३० वाजता बारामती शहरात एका भव्य शक्तीप्रदर्शनाद्वारे या दौऱ्याची सांगता होणार होती.

आज केवळ सभाच नव्हत्या, तर अजित पवार रणनीतिकार म्हणूनही मैदानात उतरणार होते.

**उमेदवारांशी संवाद:** बारामती आणि इंदापूर परिसरातील सर्व उमेदवारांशी ते वैयक्तिक चर्चा करून त्यांना विजयाचा मंत्र देणार होते.

**स्थानिक पदाधिकारी:** दुपारी जेवणाच्या वेळी त्यांनी स्थानिक जुन्या-जाणत्याकार्यकर्त्यांशी संवाद साधून निवडणुकीतील बारीक-सारीक अडचणी समजून घेण्याचे ठरवले होते.

अजित पवारांच्या या दौऱ्यातून महायुतीला मोठी ताकद मिळणार होती. मात्र, आजच्या या दुर्दैवी घटनेने राज्याच्या राजकारणातील एक धगधगता ज्वालामुखी शांत झाला आहे. शेवटच्या क्षणापर्यंत लोकांसाठी काम करण्याची जिद्द उराशी बाळगून निघालेल्या या लोकनेत्याचा प्रवास बारामतीच्या वेशीवरच थांबला.

**सभेच्या मंचावर पसरली सुन्न शांतता!**

बारामतीतील सुपे येथे जेव्हा सभा सुरू होण्याची वेळ झाली, तेव्हा हजारो कार्यकर्ते तिथे जमले होते. मात्र, काही वेळातच विमान अपघाताची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि सभेच्या उत्साहाचे रूपांतर आक्रोशात झाले. ज्या मंचावरून दादा विरोधकांचा समाचार घेणार होते, त्याच मंचावरून त्यांच्या निधनाची अधिकृत बातमी सांगावी लागली.

**महत्त्वाची बैठक**

संध्याकाळी ७ वाजता त्यांच्या निवासस्थानी बारामतीच्या भविष्यातील विकासकामांचा आढावा घेण्यासाठी ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

सभेच्या मंचावर पसरली सुन्न शांतता!

बारामतीतील सुपे येथे जेव्हा सभा सुरू होण्याची वेळ झाली, तेव्हा हजारो कार्यकर्ते तिथे जमले होते. मात्र, काही वेळातच विमान अपघाताची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि सभेच्या उत्साहाचे रूपांतर आक्रोशात झाले. ज्या मंचावरून दादा विरोधकांचा समाचार घेणार होते, त्याच मंचावरून त्यांच्या निधनाची अधिकृत बातमी सांगावी लागली, हा बारामतीसाठी सर्वात मोठा दुर्दैवी क्षण ठरला.

### ऐतिहासिक निर्णय अन्? दादांचा रोखठोक बाणा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २८**

अजित पवार म्हणजे केवळ एक राजकीय नाव नसून ती एक सिस्टम होती. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक असा अध्याय संपला आहे, ज्याने कधीही तडजोड स्वीकारली नाही. त्यांच्या संपूर्ण प्रवासात त्यांनी घेतलेले काही ऐतिहासिक निर्णय आणि त्यांचा गाजलेला दादा बाणा आजही प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा विषय आहे.

**ऐतिहासिक निर्णय: ज्यांनी राज्याचा चेहरा बदलला**

**जलयुक्त शिवार आणि सिंचन प्रकल्प:** जलसंपदा मंत्री असताना त्यांनी राज्यात सिंचनाचे जाळे विणण्यासाठी हजारो कोटींचे प्रकल्प मार्गी लावले. सिंचन क्षमता वाढवण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही शेतीसाठी पूरक ठरत आहेत.

**पुणे-पिंपरीचिंचवडचा कायापालट:** पुण्याचे पालकमंत्री म्हणून मेट्रो प्रकल्पाला गती देणे आणि पिंपरी-चिंचवडला बेस्ट सिटीचा दर्जा मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

## अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली !, एका लोकनेत्याला महाराष्ट्राने गमावले - आ.विजय वडेट्टीवार



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.२८:** महाराष्ट्राच्या राजकारणातील शिस्तप्रिय, कुशल प्रशासक आणि राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री माननीय अजितदादा पवार यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आणि दुःखद आहे.विमान अपघातात त्यांचा झालेला मृत्यू ही महाराष्ट्राची हानी आहे. अजित पवार यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली तेव्हा कडक शिस्तीचे आणि प्रशासनावरील पकड, वेळ पाळणारे अजित दादा हे गुण त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते.पहाटेपासून कामात व्यग्र असणारे, प्रशासकीय अधिकारी असो वा सामान्य नागरिक सर्वांसाठी सदैव उपलब्ध असणारे ते 'दादा' होते.एकदा शब्द दिला की ते काम पूर्ण करणारे, प्रामाणिक आणि कार्यतत्पर नेतृत्व म्हणून अजितदादा पवार यांनी महाराष्ट्राच्या जनमानसात वेगळे स्थान निर्माण केले होते.महाराष्ट्रासाठी अजून मोठे कार्य त्यांच्या हातून व्हायचे असताना नियतीने हा घात केला. अजित दादा यांच्या अचानक जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली.पवार कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांना या दुःखातून सावरण्याचे धैर्य लाभो. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# जनसामान्यांचा नेता हरवला : पालकमंत्री डॉ.अशोक उईके



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.२८ :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने जनसामान्यांचा नेता हरविला आहे. अजित दादांचा स्वभाव हा अतिशय मनमोकळा आणि निर्भीड होता. प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव आणि राज्याच्या प्रश्नांची जाण असलेल्या या नेत्याला संपूर्ण महाराष्ट्र माहीत होता. अजितदादांचा अभ्यास अतिशय दांडगा असल्यामुळे त्यांची राज्याच्या राजकारणावर पकड होती. जनसामान्याच्या प्रश्नांना त्यांनी नेहमीच पुढे येऊन मदत केली आहे.वेळेच्या बाबतीत ते अतिशय काटेकोर असायचे. कार्यालयीन कामकाज असो विधिमंडळातील भाषणे असो की सार्वजनिक व्यासपीठावर केलेले मार्गदर्शन असो, त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व झळकत होते. अशा या उमद्या नेत्याला आज महाराष्ट्र मुकला आहे. ही राज्याचीच नव्हे तर देशाची अपरिमित हानी आहे. मंत्रिमंडळातील माझे सहकारी गमावल्याचे अतिशय दुःख आहे. दादांना विनम्र श्रद्धांजली.




## जनसेवेसाठी तत्पर लोकनेता, सहृदय मित्र गमावला : आ सुधीर मुनगंटीवार



कै.अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अभ्यासू, अनुभवी आणि ठाम विचारांचे नेतृत्व होते. मतभेद असले तरी विचारांचा आदर राखणे, आणि राजकारणाच्या पलीकडे जाऊन माणुसकी जपणे–ही त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या जाण्याने राजकीय क्षेत्रात एक स्पष्ट वक्ता, आणि वैयक्तिक आयुष्यात एक सहृदय मित्र आपण गमावला आहे, अशा शब्दात माजी मंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांनी शोकभावना व्यक्त केली व्यक्त केली आहे.अजितदादांचा स्वभाव हा नेहमीच स्पष्ट आणि निर्भीड वक्तेपणाचा राहिला. जे योग्य वाटे ते त्यांनी कोणताही आडपडदा न ठेवता मांडले. सत्ता, विरोध किंवा समीकरणे यापेक्षा जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी त्यांची भूमिका अनेकदा राजकीय चर्चांना दिशा देणारी ठरली. मतभिन्नता असूनही परस्पर सन्मान राखण्याची त्यांची शैली आजच्या राजकारणात दुर्मिळ म्हणावी अशी होती.

## माणुसकी जपणारा एक लोकनेता हरपला - खासदार प्रतिभा धानोरकर




'आज मन अतिशय विषण्ण झाले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे व्यक्तिमत्त्व आणि माझ्या वैयक्तिक आयुष्यात एका मोठ्या भावाचा आधार असलेले अजितदादा आपल्यातून असे अचानक निघून जातील, याची कल्पनाही करवत नाही. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकीय पटलावर मोठी पोकळी निर्माण झाली असून, आमच्या कुटुंबाचे कधीही भरून न निघणारे वैयक्तिक नुकसान झाले आहे.माझे पती, दिवंगत खासदार बाळू धानोरकर जेव्हा दिल्ली येथे गंभीर आजारी होते, तो काळ आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत कठीण आणि संघर्षाचा होता. ती बातमी समजताच अजितदादांनी राजकारणाच्या पलीकडे जाऊन रक्ताच्या नात्याप्रमाणे धाव घेतली. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपल्या स्वीय सहाय्यकांना तातडीने दिल्लीला पाठवले आणि उपचारांसाठी एअर अँब्युलन्सची व्यवस्था केली. संकटाच्या त्या काळात त्यांनी दिलेला तो 'हक्काच्या भावाचा' आधार मी कधीही विसरू शकणार नाही.

## संवेदनशील नेतृत्वाचा अस्त - आ.जोरगेवार



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातच नव्हे, तर देशाच्या राजकारणात आणि सामाजिक क्षेत्रात अपूरणीय पोकळी निर्माण झाली आहे. सामाजिक भान, अनुभव आणि नेतृत्वगुण असलेला एक मोठा नेता आज आपल्यातून निघून गेला आहे.एक संवेदनशील, कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा नेता देशाने गमावला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.स्व. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना, समर्थकांना व लाखो चाहत्यांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो हीच माता महाकाली चरणी प्रार्थना करतो.

## महाराष्ट्राने कुशल राजकारणी व मोठा जनाधार असणारा नेता गमावला - हंसराज अहीर



अत्यंत दुःखद आणि अविश्वसनीय अशी ही घटना आहे. ऐन उमेदीच्या काळामध्ये झालेला हा अपघाती मृत्यु हळहळ व्यक्त करणारा आहे. यामुळे अख्खा महाराष्ट्र हादरलेला आहे. हे खर आहे की, राजकीय मंचावरचा एक मोठा जनाधार असणारा हा नेता होता. कुशल संघटक, उत्तम प्रशासक म्हणून ख्याती प्राप्त अजितदादांनी अनेक वर्ष राजकारणात कार्य करतांना असंख्य माणसे जोडली आणि ती टिकवून ठेवली. आजही त्यांच्या नावाने असंख्य कार्यकर्ते एकत्रित यायचे, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे. राजकारणातला अशा शक्तीशाली नेता आज महाराष्ट्राने गमावला आहे. यावेळेस ते सत्तेतही होते. त्यांच्या सारखा राजकारण व सत्तेमधला अनुभवी नेता एकाएकी निघून जाणे ही महाराष्ट्राची फार मोठी हानी आहे, आज महाराष्ट्राला त्यांची गरज होती.

# गोवरी येथील लोंबकळलेल्या वीज तारा ठरताहेत धोकादायक !

## विज वितरण विभागाचे दुर्लक्ष



युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी
**राजुरा दि.२८ :** तालुक्यातील गोवरी येथील नागरिक श्रीधर जुनघरी यांच्या घरासमोरील मुख्य रस्त्यावर वीज खांब वाकल्याने गावाला विज पुरवठा करणाऱ्या वीज तारा लोंबकळत आहे.त्यामुळे याठिकाणांहून जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.राजुरा वीज वितरण कंपनीचे याकडे दुर्लक्ष झाल्याने याठिकाणी कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे.

राजुरा तालुक्यातील ग्रामीण भागात विज वितरण विभागाच्या गलथान कारभारामुळे अनेक ठिकाणी विजेच्या जिवंत वीज तारा लोंबकळत आहे.

मागील अनेक दिवसांपासून गोवरी गावाला विज पुरवठा करणारी वीज वाहिनी गेलेली आहे. मात्र येथील खांब वाकल्याने या वीज तारा गेल्या अनेक दिवसांपासून लोंबकळत आहे. यासंदर्भात गावकऱ्यांनी अनेकदा विज वितरण विभागाकडे तक्रारी केल्या, मात्र लोंबकलणाऱ्या वीज तारांची स्थिती जैसे थे आहे. गोवरी येथील नागरिक श्रीधर जूनघरी यांच्या घरासमोरील मुख्य रस्त्यावर विजेच्या तारा पुर्णपणे लोंबकळत आहेत.या तारा रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना लागत असल्याने कोणत्याही क्षणी याठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.याबाबत नागरिकांनी महावितरण कंपनीला लोंबकळत असलेल्या वीज तारा सुरळीत करून देण्याची विनंती केली.मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नसल्याने लोंबकळत असलेल्या जिवंत विद्युत तारांमुळे दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असून रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे लोंबकळत असलेल्या जिवंत वीज तारा सुरळीत करण्याची मागणी गोवरी येथील नागरिकांनी केली आहे.

### रस्त्याने जातांना होऊ शकते मोठी दुर्घटना....

गोवरी येथील गावात येणाऱ्या मुख्य मार्गावर श्रीधर जुनघरी यांच्या घरासमोर गावाला विज पुरवठा करणारी वीज वाहिनी गेली आहे. मात्र या जिवंत वीज तारा लोंबकळत असल्याने या ताराखालून शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची स्कूलबस दररोज याच विजेच्या लोंबकळत असलेल्या तारा खालून जाते.त्यामुळे विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे तारांचा स्पर्श होऊन याठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे.

## दिव्यांग मुलांच्या सन्मानाचा उत्सव

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.२८ :** लोककल्याण बहुउद्देशीय शिक्षण संस्था, ब्रह्मपुरी द्वारा संचलित स्वामी विवेकानंद मतिमंद मुलांची निवासी शाळा, नागभीड येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर दिव्यांग मुलांच्या हक्कांचा, आत्मसन्मानाचा आणि उज्ज्वल भविष्यासाठीच्या निर्धाराचा साक्षीदार ठरला.संस्थेचे संस्थापक पुरुषोत्तम चौधरी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेक पवनीकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य संजय दुर्योधन, सामाजिक कार्यकर्ते येरने, सेवानिवृत्त शिक्षक शंभरकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य सौ. ज्योतीताई भरले, सौ. झाडे तसेच शाळेचे अधिक्षक नरेंद्र बोरकर मंचावर उपस्थित होते.

# डॉ.खत्री महाविद्यालयात तारामंडळ ओळख विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.२८ :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथे आज दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी तारामंडळ (फिरते नभांगण) ओळख या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. हा उपक्रम संकलन महाराष्ट्र राज्य सहकार्य व वैज्ञानिक जाणीव शिक्षण या कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात व्हिडिओ चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवकाशगंगेची निर्मिती, तारामंडळाची रचना, विविध ग्रहांची माहिती तसेच पृथ्वीच्या ग्रहांचे कालचक्र याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत शास्त्रीय माहितीची उत्सुकतेने नोंद घेतली .

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. पी. एम. जाधव व श्री. संजय कांबळे यांनी ९५ विद्यार्थ्यांना तारामंडळ ग्रहाची स्थिती आणि वैशिष्ट्ये याबाबत सखोल माहिती दिली. तसेच सदर कार्यक्रमाला संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपूर, कोषाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुवर्णा राऊत यांनी केले तर मान्यवरांचे आभार डॉ. दिपाली दांडेकर यांनी मानले. कार्यक्रमाकरीता प्रा.सादलवार, प्रा. नाट, प्रा. पॉल, प्रा. गायकवाड, प्रा. नागपुरे, प्रा. मोहितकर तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्राबाबत आवड निर्माण होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लावण्यास मदत होणार आहे.

## क्रीडा स्पर्धांमुळे युवकांमध्ये संघभावना व नेतृत्वगुणांचा विकास - सौ.सोनाली भास्कर कावळे (बांगडे)



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.२८ :** 'क्रीडा स्पर्धांमुळे युवकांमध्ये संघभावना, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित होतात. ग्रामीण युवकांनी खेळाच्या माध्यमातून आपली क्षमता सिद्ध करावी,' असे मत सामाजिक कार्यकर्त्या सौ. सोनाली भास्कर कावळे (बांगडे) यांनी व्यक्त केले.त्या वीर भगवान बिरसा मुंडा मित्र मंडळ, मोहाडी तुकूम (ता. बल्लारपूर) यांच्या वतीने आयोजित भव्य पुरुषांची ग्रामीण रबरी बॉल क्रिकेट स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलत होत्या.या क्रिकेट स्पर्धेत मराठा क्रिकेट क्लब, चिरोली यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम पारितोषिकावर आपले नाव कोरले. तर यजमान संघ वीर भगवान बिरसा मुंडा मित्र मंडळ, मोहाडी तुकूम यांना द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. विजेत्या मराठा क्रिकेट क्लबच्या संघाला सौ. सोनाली भास्कर कावळे (बांगडे) यांच्या शुभहस्ते प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मराठा क्रिकेट क्लबच्या खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील युवकांनी क्रीडा क्षेत्रात दाखवलेली गुणवत्ता, जिद्द व संघभावना कौतुकास्पद असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.कार्यक्रमास बल्लारपूर काँग्रेस कमिटीचे ग्रामीण तालुकाध्यक्ष गोविंद उपरे, सामाजिक कार्यकर्ते भास्कर कावळे, किन्हीचे माजी सरपंच वासुदेव येरगुडे, शंकर खोब्रागडे, कन्हेर बुरांडे, अरुण पेंदोर, आनंदराव ढोंगे, शेखर कन्नाके तसेच मारुती राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

## रोजगार व स्वयं रोजगार कार्यशाळेतून बेरोजगार युवकांना मार्गदर्शन

युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी
**राजुरा दि.२८ :** कोळसा खाण क्षेत्रातील भुमिहीन बरोजगार युवक व व्यावसायीक शिक्षण घेतलेल्या युवकांच्या रोजगार व स्वयं रोजगाराकरिता तज्ज्ञ मार्गदर्शकांचे व्याख्यान आयोजित करून अशा युवक-युवतींना योग्य दिशा देण्याच्या उद्देशातून साखरी येथील संघर्ष युवा विकास मंडळाद्वारे पुढाकार घेत दि. २५ जानेवारी रोजी स्वयं रोजगार, गृह व लघु उद्योग कार्यशाळा आयोजित केली होती.

सदर कार्यशाळेच्या व्यासपीठावर संघर्ष युवा विकास मंडळाचे अध्यक्ष राजु घरोटे, सरपंच प्रणालीताई मडावी, ज्येष्ठ नागरीक रामचंद्र लांडे, राजुराचे रूपेश भाकरे, कैलास कारलेकर, बचतगट फेडरेशनच्या अध्यक्षा संगीताताई आत्राम आदींची उपस्थिती होती.

साखरी (वाघोबा) येथील जि.प. शाळेमध्ये आयोजित हा कार्यक्रम मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त घेण्यात आला. सदर कार्यशाळेस पुणे येथील दत्तात्रयजी आंबुलकर व्यवस्थापन सल्लागार, सिपेट चंद्रपूरचे प्लेसमेंट अधिकारी पुष्कर देशमुख व सिसकॉन इज्युमेंट फाऊंडेशन चंद्रपूरचे संजय दाणेकर यांचेद्वारा रोजगार व स्वयं रोजगाराविषयक अत्यंत उपयुक्त माहिती उपस्थितांना देण्यात आली.

### जाहीर सूचना

या द्वारे जनतेला सूचित करण्यात येते की अर्जदार श्री /श्रीमती फातिमा जोहरा फारूख अहेमद (लग्न पूर्वीचे नाव फातिमा जोहरा कल्लू उर्फ वहीद खान) राह.सुभाष वार्ड तह.बल्लारपूर, जिल्हा.चंद्रपुर यांचा जन्म दिनांक ११/०७/१९७८ रोजी त्याच्या राहते घरी झालेला असून त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद बल्लारपूर येथे केलेली नाही करीता अर्जदाराने सदर जन्म नोंद करने बाबत जन्म मृत्यू नोंदनी कायद्याच्या तरतुदी प्रमाणे न. प. बल्लारपूर येथे नोंद घेऊन जन्म प्रमाणपत्र मिळण्यां करीता कार्यालयात दिनांक १७/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केलेला आहे. सदर जाहिरनामा द्वारे वरील अर्जदाराच्या मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळने बाबत कुणाला हरकत/तक्रार/आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध केल्याच्या दिनांक पासून १५ दिवसाच्या आत आपली लेखी तक्रार/हरकत/आक्षेप नोंदवावा अन्यथा कुणालाही विरोध किंवा तक्रार नाही असे समजून जन्म प्रमाणपत्र देण्या बाबतचा आदेश पारित करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी

उपविभागीय दंडाधिकारी
तथा उपविभागीय
अधिकारी बल्लारपूर

# महामार्गांवरील पेट्रोल पंपांवर महिलांसाठी स्वच्छ व सुरक्षित शौचालय अद्ययावत करण्याचे स्पष्ट अंमलबजावणीचे आदेश

## माजी अर्थमंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांचा पाठपुरावा



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी
**चंद्रपूर दि.२८ :** राष्ट्रीय व राज्य महामार्गावर प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांच्या सन्मान, सुरक्षितता आणि आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या स्वच्छ व सुरक्षित शौचालयांच्या प्रश्नावर राज्याचे माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यानी केंद्र सरकारकडे पत्र लिहून ठामपणे भूमिका मांडली. त्यांच्या या संवेदनशील व लोकहिताच्या मागणीला गांभीर्याने दखल घेत केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने अधिकृत स्पष्टीकरण देत देशभरातील पेट्रोल पंपांवरील शौचालय व्यवस्थेबाबतची सद्यस्थिती स्पष्ट केली असून महामार्गांवरील पेट्रोल पंपांवर महिलांसाठी स्वच्छ व सुरक्षित शौचालय अद्ययावत करण्याचे स्पष्ट अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी ९ नोव्हेंबर २०२५ रोजी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री श्री. हरदीपसिंगजी पुरी यांना पत्र पाठवून राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील पेट्रोल पंपांवर महिलांसाठी उच्च दर्जाची, स्वच्छ, सुरक्षित व सन्मानजनक शौचालये अनिवार्य करण्याची ठोस मागणी केली होती. महिलांना राष्ट्रनिर्माणाची प्रमुख शक्ती मानणाऱ्या केंद्र सरकारच्या धोरणांचा संदर्भ देत त्यांनी स्वच्छ भारत अभियान, उज्ज्वला योजना, बेटी बचाओ-बेटी पढ़ाओ यांसारख्या उपक्रमांची आठवण करून दिली.

महामार्गांवरील प्रवासादरम्यान मातां, भगिनींना व मुलींना मूलभूत सुविधांचा अभाव भासू नये, ही भूमिका त्यांनी ठामपणे मांडली होती.

आपल्या पत्रात आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले होते की, पेट्रोल पंप हे प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचे विश्रांती व थांब्याचे केंद्र असते. मात्र अनेक ठिकाणी शौचालयांची अवस्था समाधानकारक नसल्याने महिलांना गैरसोयींचा सामना करावा लागतो. स्वच्छतेचा अभाव, पाणी व वीजेची कमतरता, महिलांसाठी स्वतंत्र सुविधा नसणे, रात्री अपुरा प्रकाश आणि सुरक्षिततेचा अभाव या बाबी विशेषतः वृद्ध महिला, गर्भवती महिला व लहान मुलींसाठी अडचणी निर्माण करतात, याकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले होते.आ. मुनगंटीवार यांच्या या पाठपुराव्यानंतर पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयातील संचालक श्री. अरुण कुमार यांनी अधिकृत उत्तर देत तेल विपणन कंपन्यांच्या अंतर्गत पेट्रोल पंप डीलर्सना ग्राहक सेवेसाठी किमान मानके पाळणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. यामध्ये स्वच्छ, आरोग्यदायी व वापरयोग्य शौचालयांची उपलब्धता अनिवार्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे.मंत्रालयाच्या माहितीनुसार, पेट्रोल पंप डीलर्सना दररोज शौचालयांची तपासणी करणे आवश्यक असून स्वच्छता, पुरेसा प्रकाश, कार्यरत फ्लश, पाण्याची उपलब्धता, दरवाज्यांची योग्य व्यवस्था, स्पष्ट दिशादर्शक फलक, सर्व प्रवाशांसाठी मुक्त प्रवेश आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच ग्राहकांच्या अभिप्रायासाठी शौचालयाजवळ 'दर्पण' क्यूआर कोड लावणेही अनिवार्य असून नियमांचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाते, असेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत देशभरात एकूण ९०,२५१ पेट्रोल पंप कार्यरत असून त्यापैकी ७२,६०७ तेल विपणन कंपन्यांच्या पेट्रोल पंपांवर महिलांसाठी स्वतंत्र शौचालयांची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती मंत्रालयाने दिली आहे. नव्याने सुरू होणाऱ्या सर्व पेट्रोल पंपांवर महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालयांची तरतूद बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच तेल कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी नियमितपणे पेट्रोल पंपांची पाहणी करून स्वच्छतेवर व सुविधांवर लक्ष ठेवत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

### जाहीर सूचना

या द्वारे जनतेला सूचित करण्यात येते की अर्जदार श्री /श्रीमती सतीश कुमार तुणकी राह.डॉ.राजेंद्र प्रसाद वार्ड तह.बल्लारपूर, जिल्हा.चंद्रपुर यांचा मुलगा (वैभव सतिशकुमार तुणकी)यांनी त्यांची जन्म दिनांक ०६/०६/२०१२ रोजी त्यांच्या राहते घरी झालेला असून त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद बल्लारपूर येथे केलेली नाही करीता अर्जदाराने सदर जन्म नोंद करने बाबत जन्म मृत्यू नोंदनी कायद्याच्या तरतुदी प्रमाणे न. प. बल्लारपूर येथे नोंद घेऊन जन्म प्रमाणपत्र मिळण्यां करीता कार्यालयात दिनांक १८/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केलेला आहे. सदर जाहीरनामा द्वारे वरील अर्जदाराच्या मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळने बाबत कुणाला हरकत/तक्रार/आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध केल्याच्या दिनांक पासून १५ दिवसाच्या आत आपली लेखी तक्रार/हरकत/आक्षेप नोंदवावा अन्यथा कुणालाही विरोध किंवा तक्रार नाही असे समजून जन्म प्रमाणपत्र देण्या बाबतचा आदेश पारित करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी

उपविभागीय दंडाधिकारी
तथा उपविभागीय
अधिकारी बल्लारपूर

### जाहीर सूचना

या द्वारे जनतेला सूचित करण्यात येते की अर्जदार श्री /श्रीमती सतीश कुमार तुणकी राह.डॉ.राजेंद्र प्रसाद वार्ड तह.बल्लारपूर, जिल्हा.चंद्रपुर यांचा मुलगा( विवेक सतिशकुमार तुणकी)यांनी त्यांची जन्म दिनांक ०६/०७/२०१३ रोजी त्यांच्या राहते घरी झालेला असून त्यांच्या जन्माची नोंद नगरपरिषद बल्लारपूर येथे केलेली नाही करीता अर्जदाराने सदर जन्म नोंद करने बाबत जन्म मृत्यू नोंदनी कायद्याच्या तरतुदी प्रमाणे न. प. बल्लारपूर येथे नोंद घेऊन जन्म प्रमाणपत्र मिळण्यां करीता कार्यालयात दिनांक १८/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केलेला आहे. सदर जाहीरनामा द्वारे वरील अर्जदाराच्या मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळने बाबत कुणाला हरकत/तक्रार/आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध केल्याच्या दिनांक पासून १५ दिवसाच्या आत आपली लेखी तक्रार/हरकत/आक्षेप नोंदवावा अन्यथा कुणालाही विरोध किंवा तक्रार नाही असे समजून जन्म प्रमाणपत्र देण्या बाबतचा आदेश पारित करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी

उपविभागीय दंडाधिकारी
तथा उपविभागीय
अधिकारी बल्लारपूर

युवाराष्ट्र दर्शन

# भंडारा जिल्हा

गुरुवार दि.२९ जानेवारी २०२६

## आंबाडी येथे मध्यरात्री घरफोडी



**भंडारा :** तालुक्यातील आंबाडी येथे बौद्ध विहारालगत राहुल बोरकर कुटुंबासह वास्तव्यास आहेत. दि.२३ जानेवारीला परिवारातील लग्न समारंभासाठी बाहेरगावी गेले. घर कुलूप बंद असल्याची संधी साधून २५ जानेवारीच्या मध्यरात्री घरफोडी झाली असल्याचे सकाळी घरासमोरील निवासी रोहित राऊत याला घराचे कुलूप तुटले असल्याचे लक्षात आले. ग्रामस्थानी चोरीची घटना झाली असल्याची बाब पोलीस पाटील दुर्गा शेन्डे यांना कळविले. त्यांनी कारधा पोलीस स्टेशनला माहिती दिली. घरफोडीची दखल घेत कारधा पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक नविनकिशोर इंगळे आणि प्रदीप गडदे ताफ्यासह घटनास्थळी पोहचले. घरमालक राहुल बोरकर यांनी ४००० रुपये रोख रक्कम व आलमारी तोडून काही सामान गेल्याचे सांगितले.

सदर प्रकरणाचा तपास ठाणेदार गोकुल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक नवीनकिशोर इंगळे व प्रदीप गडदे, बिट अंमलदार विनायक साठवणे करीत आहेत.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांचे आज सकाळी विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. बारामती विमानतळाजवळ लँडिंग करताना तांत्रिक अडचणींमुळे विमान कोसळले आणि त्यात अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला.


अजित पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, दिवंगत उपमुख्यमंत्र्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि शोक व्यक्त करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच, २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यभर तीन दिवसांचा राज्य शोक पाळण्यात येणार आहे.

या काळात सर्व शासकीय इमारतींवर राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येणार असून कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम होणार नाहीत. उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या निधनामुळे संपुर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात असुन संपुर्ण महाराष्ट्रासह देशातुन सर्वच स्तरातील मान्यवरांकडुन अजित पवार यांना श्रध्दांजली व्यक्त करण्यात येत आहे.

आमचे नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्या निधनाने आमचा आधारस्तंभ हरपला आहे. ही घटना अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक आहे. गेली अनेक वर्षे मी त्यांच्यासोबत काम केले. जेव्हा-जेव्हा दादांसोबत भेट होत असे, ते नेहमीच आस्थेने चौकशी करत. तब्येतीची काळजी घेण्याचा नेहमीच सल्ला देत असत. त्यांचे आणि माझे राजकारणापलीकडे कौटुंबिक संबंध होते.

दादांचे निधन ही माझ्यासाठी फार मोठी वैयक्तिक हानी आहे. त्यांच्या निधनाने राजकारणातील एक कुशल प्रशासक, कठोर निर्णय घेण्याची क्षमता असलेले आणि ग्रामीण भागाशी घट्ट नाळ जोडलेले नेतृत्व आपण गमावले आहे. जवळपास ३५ वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय प्रवासात त्यांनी असंख्य कार्यकर्ते घडवले, जनतेसाठी तत्पर असणारे पुरोगामी विचारांचे नेतृत्व घडवले तसेच जनतेच्या प्रश्नांसाठी सदैव लढा दिला. ज्या ज्या वेळी दादांशी भेट व्हायची, तेव्हा-तेव्हा सामान्य माणसाच्या अडीअडचणी, शेतकरी, कष्टकरी, युवक आणि महिलांचे प्रश्न सोडवले पाहिजेत, हे आपुलकीने व तळमळीने ते मांडायचे आणि त्यासाठी आग्रही असायचे. सर्वसामान्य जनतेचे लाडके नेतृत्व आज आपल्यात राहले नाही, ही अत्यंत दुःखद घटना आहे. आजचा दिवस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह संपूर्ण महाराष्ट्राच्या इतिहासातील एक काळा दिवस ठरला आहे.

मा. श्री. अजितदादा पवार यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या दुःखद प्रसंगी पवार कुटुंबियांप्रती माझ्या सहसंवेदना व्यक्त करतो. तसेच पवार कुटुंबियांना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांना हे अपार दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. ॐ शांती



**प्रफुल पटेल**
**खासदार**

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा. अजितदादा पवार यांचे विमान अपघातात झालेल्या दुर्दैवी निधनाची बातमी मनाला खुप वेदना देणारी आहे. हा अपघात संपूर्ण महाराष्ट्रासाठी मोठा धक्का आहे. अजितदादा पवार यांनी आपल्या आयुष्यात कायम जनतेसाठी काम केले. शेतकरी, कामगार, युवक आणि सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांसाठी ते नेहमी पुढे राहत होते. विकासकामांबाबत त्यांचा दृष्टिकोन आणि वेगळी कार्यशैली सर्वांना परिचित होती. या कठीण प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची ताकद देवो, हीच प्रार्थना.



**डॉ.प्रशांत यादवराव पडोळे**
**खासदार, लोकसभा**
**भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्र**

## महाराष्ट्राचं 'दादा' व्यक्तिमत्व हरपलं



बुधवारी सकाळी बारामतीत झालेल्या विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांच्या निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक आणि वेदनादायी आहे. राज्याच्या राजकारणात दादांचा दबदबा आहे, दरारा आहे मात्र दहशत नव्हती. राजकारण, समाजकारण करताना सबंध राज्यात त्यांचं लक्ष असायचं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून, भंडारा जिल्हा बँकेचा अध्यक्ष म्हणून आदरणीय प्रफुल पटेल साहेबांच्या सोबत शरद पवार साहेब, अजितदादा पवार यांच्याशी माझा फार जवळून संपर्क आला. दादांसोबत कुठेही भेट झाल्यानंतर बँकेच्या कारभाराची आणि पक्षासह कुटुंबियांची दादा आवर्जून विचारपूस करत.

आमच्या भंडारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या यशाचा अजितदादांना कायम आनंद होता. आमची भेट ठरवलेली असो की अचानक झालेली असो, "सुनील, बँक काय म्हणते, कसं चाललंय" असं अगदी भारदस्त आवाजाने विचारायचे. राजकारणात जात महत्त्वाची आहे, हे नरेटीव्ह सेट होत असताना जातीपातीच्या पलीकडे जाऊन कामाच्या बळावर अनेक कार्यकर्त्यांना अजितदादांनी मोठं केलं, हे उभ्या महाराष्ट्राने अनुभवलं आहे. अजितदादा आपल्या राजकीय आयुष्यात उभे होत असताना शरद पवार साहेबांच्या सावलीत वाढले. अनेक गुणवैशिष्ट्ये त्यांनी पवार साहेबांकडून आत्मसात केली. मात्र एवढ्या मोठ्या वटवृक्षाच्या छत्रछायेत राहताना केवळ बारामती आणि पुण्यात नव्हे तर सबंध राज्यात आपल्या राजकारणाची विशेष छाप सोडली. शिस्तप्रिय, प्रशासनावर पकड असलेला, जनसामान्यांच्या प्रश्नाप्रती अतिशय चांगली समज असलेला, सर्वसामान्य माणसाप्रती प्रेम आणि कळवळा असलेला दादा माणूस मी अनेक वर्ष जवळून अनुभवला.

बुधवारच्या सकाळच्या बातमीने माझ्यासह अनेकांना मोठा धक्का बसला. दादांच्या अकाली निधनाने महाराष्ट्र आणि देश एका चांगल्या, द्रष्ट्या नेत्याला, खऱ्या अर्थाने दादा माणसाला मुकला. आदरणीय अजितदादांचं असं अकाली जाणं हा संपूर्ण पवार कुटुंबीयांवर आणि महाराष्ट्रावर मोठा आघात आहे. पवार कुटुंबीयांसह आमच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांची आणि महाराष्ट्राच्या राजकारणाची झालेली ही हानी कधीही न भरून निघणारी आहे. आदरणीय अजितदादांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली...

**सुनील फुंडे**
**अध्यक्ष, भंडारा जिल्हा**
**मध्यवर्ती सहकारी बँक**

## निस्वार्थपणे कार्य करणारे एक प्रभावी नेतृत्व हरवले!

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय श्री. अजितदादा पवार यांच्या अचानक झालेल्या अपघाताने समस्त महाराष्ट्राचे मन हेलावून गेले आहे. राज्य आणि समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणारे एक प्रभावी नेतृत्व आपणा सर्वांचे अजितदादा आपल्यातून निघून गेले, ही अत्यंत वेदनादायी घटना आहे. त्यांचे राज्याच्या जडणघडणीत मोठे योगदान राहिले आहे. प्रशासकीय पातळीवर कार्य करण्याची त्यांची हातोटी अतुलनीय होती. त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा ठसा सदैव स्मरणात राहील. त्यांच्या विचारांने, कर्तृत्वाने आणि सेवाभावाने पुढील पिढ्यांना सतत प्रेरणा मिळत राहील.



ईश्वर आदरणीय अजितदादा यांच्या दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो आणि शोकाकुल परिवारास या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो.

**डॉ.पंकज भोयर**
**राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन**

## महाराष्ट्राचे उमदे तडफदार नेतृत्व हरपले – धनंजय दलाल

मा. अजितदादा पवार म्हणजे पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी यांचा जीव की प्राण होते.पक्ष कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या मनातील तळमळ जाणून घेणारा प्रसंगी आपले काम बाजूला सारुन धाऊन जाणारा सर्वाच्या मनातील नेता म्हणजे मा.अजितदादा पवार साहेब.



विलक्षण निर्णयक्षमता व काळाची पावले ओळखण्याची विशेष हातोटी अजितदादांना लाभली होती.एकदा निर्णय घेतला की त्यासाठी सर्वस्वपणाला लावायला दादा कधीही मागे हटत नव्हते.भंडारा जिल्ह्यावर त्यांचे निःस्सीम प्रेम होते. जिल्ह्यातील सिंचनासाठी त्यांनी केलेली मदत कोणताही राजकारणी नाकारु शकत नाही ईतकी मदत त्यानी केली आहे.वेळेच्या बाबतीत ईतके काटेकोर की त्यांच्या येण्याने अधिकारी व पदाधिकारी धावत पळत वेळेवर हजर राहत. गोसेखुर्द धरणाच्या निधीसाठी मा.अजितदादा भंडारा येथील गोसेखुर्द येथे सकाळी ७.०० वाजता आले तो प्रसंग व अधिकाऱ्यांची तारांबळ आजही आठवते.विमान काही क्षणात उतरणार होते पण काळाने घाला घातला आणि महाराष्ट्रचे प्रभावी, उमदे, तडफदार, महत्वाकांक्षी निर्णय घेणारे नेतृत्व हिरावून नेले.

**धनंजय दलाल**
**प्रदेश महासचिव महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

## दादांच्या अकाली निधनाने मार्गदर्शक गमावला !



महाराष्ट्राच्या मातीतील कणाकणाची आणि महाराष्ट्रातील जनतेच्या प्रश्नांची अचूक माहिती असलेले लोकनेते माननीय अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने माझ्यासारख्या तरुण आमदारांसाठी विधिमंडळातील मार्गदर्शक हरपला.

प्रशासनावरील पकड असलेले, कार्यकर्त्यांना बळ देणारे आणि आपल्या मिश्किल स्वभावाने क्षणात वातावरण हलकंफुलकं करणारे अजितदादा आपल्यात नाही, यावर अजूनही विश्वासच बसत नाही. परिषदेत आमदार म्हणून जनतेचे प्रश्न व काही निधीची गरज असताना त्यांना अनेकदा भेटलो, त्यांनी लोककल्याणसाठी निधीत हात आखडता घेतला नाही. यातूनच जनतेप्रति त्यांची कटीबद्धता दिसून येते. त्यांच्यासारख्या नेत्याच्या अकाली जाण्याने महाराष्ट्रात एक दमदार व खंबीर नेतृत्वाची कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. त्यांचे कार्य पुढील अनेक वर्षे महाराष्ट्राच्या स्मरणात राहील. अनेक वर्षांचा अनुभवी नेता, एक दूरदृष्टीचे नेतृत्व गमावले, आज महाराष्ट्रासाठी काळा दिवस आहे.

त्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. मी त्यांच्या कटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

**डॉ. परिणय फुके**
**आमदार, विधान परिषद सदस्य**

## सामान्य जनतेशी नाळ जोडलेले नेतृत्व गमावले! आशु गोंडाणे

राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांचे विमानाला बारामती येथे झालेल्या अपघातात मृत्यू झाल्याची वार्ता ऐकून मन अत्यंत व्यथित झाले आहे. हा धक्का असह्य असून, या दुःखद घटनेने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. सामान्य जनतेशी नाळ जोडलेले, राज्याच्या विकासासाठी अखंडपणे झटणारे नेतृत्व आपण गमावल्याची भावना हृदय पिळवटून टाकणारी आहे.



अजितदादांची प्रशासनावरची मजबूत पकड, कामाचा अफाट वेग आणि लोककल्याणाचा अखंड ध्यास या साऱ्यांमुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. अजितदादांचा प्रशासनातील अनुभव अतिशय समृद्ध होता.

भंडारा येथे 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमामध्ये दादांची शेवटची भेट झाली होती.त्यामध्ये त्यांच्या हाजीर जबाबीपणा अनुभवास आला होता. अजितदादांच्या अचानक आपल्याला सोडून जाण्याने महाराष्ट्रावर आलेला हा काळा दिवस कधीही न विसरता येणारा आहे. अजितदादा यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**आशु ( आशिष) गोंडाने**
**भाजपा जिल्हा अध्यक्ष,**
**भंडारा जिल्हा**

## लोकनेता हरपला : सुनील मेंढे

आपल्या रोखठोक शैलीने आणि प्रशासकीय पकडीने महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण करणारा लोकनेता अजित दादांच्या रूपाने हरपला.

दादांनी बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठी अहोरात्र कष्ट उपसले. त्यांच्या कायार्चा वारसा सदैव प्रेरणा देत राहिल. "सकाळी ७ ची वेळ आणि दादांचे काम" हे समीकरण आता इतिहास जमा झाले. शिस्तबद्धता आणि जनसामान्यांच्या कामाची तळमळ असणारे दादा कायम स्मरणात राहतील, अशी प्रतिक्रिया माजी खा. सुनील मेंढे यांनी दिली.



अजित दादा गेल्याने महाराष्ट्राने एक सक्षम प्रशासक, कामगिरीसाठी निष्ठावंत नेता हरवला आहे. त्यांचे अकस्मात निधन राज्यासाठी मोठा धक्का आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्वपूर्ण नेता, शब्दाला जागणारा, कार्यकर्त्यांना नावानीशी ओळखून त्यांना जपणारा, रोखठोक बोलणारा, प्रशासनावर मजबूत पकड असणारा, अष्टपैलू व्यतिमत्व असणाऱ्या एका नेत्याला महाराष्ट्र मुकला आहे. शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) भंडारा जिल्हातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली .



**संजय रेहपाडे ,शिवसेना जिल्हाप्रमुख भंडारा**

## शब्द पाळणारा लोकनेता हरपला!

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातील निधनाने प्रशासनाचा कणा आणि विकासाचा ध्यास असलेला एक शब्द पाळणारा लोकनेता हरपला आहे. राज्याच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान आणि त्यांची कार्यशिस्त सदैव स्मरणात राहील. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे.



**चरण वाघमारे**
**माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष,**
**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श. प.) भंडारा.**

# भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रध्दांजली

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात आज दि. २८ जानेवारी २०२६ ला महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

बारामती येथील विमान दुर्घटनेत राज्याचे लोकप्रिय जननेता अजितदादा पवार यांचे दुःखद निधन झाले. जनसेवेचा वसा, कणखर नेतृत्व व प्रशासनावर जबर पकड असलेले, सर्वसामान्य जनतेचे लाडके नेतृत्व, लोकप्रिय जननेता स्व. अजितदादा पवार यांचे दुःखद निधन झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परिवारासह संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेसाठी काळा दिवस ठरला आहे. त्यांच्या चरणी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या प्रतिमेला पुष्पवाहून अश्रुपुर्ण व भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करीत ईश्वर मृतात्म आत्म्याला शांती देवो अशी प्रार्थना उपस्थितांनी केली.




याप्रसंगी जिल्हाध्यक्ष, नानाभाऊ पंचबुध्दे, आमदार राजुभाऊ कारेमोरे, प्रदेश महासचिव धनंजय दलाल, प्रा. माधुरी पालीवाल, योगेश हेडाऊ, हेमंत महाकाळकर, शेखर (बाळाभाऊ) गभने, डॉ. जगदिश निंबार्ते, डॉ. रविंद्र वानखेडे, डॉ. श्रीकांत वैरागडे, यशवंत सोनकुसरे आरजु मेश्राम, हितेश सेलोकर, सुमित शामकुंवर, राजु पटेल, डॉ. सचिन बावनकर, सदाशिव ढेंगे, महेंद्र वाहाने, मंजुषा बुरडे, सुषमा साखरकर, किर्ती गणविर, लोकेश खोब्रागडे, नारायणसिंग राजपूत, आनंद मलेवार, रजनिश बन्सोड, उत्तम कळपते, दयानंद नखाते, सौ. रत्नमाला चेटूले, अॅड. नेहा शेंडे, डॉ. अनिता महाजन, मनिष वासनिक, रुपेश टांगले, चंद्रकांत कोहाड, अरुण भेदे, कपील जैन, अमन मेश्राम, सौ. सुनिला उपरिकर, हर्षिला कराडे, सौ. छाया गभणे, निशा राऊत, वंदना तुरस्कर, राजश्री राखडे, किर्ती कुंभरे, सौ. सारिका नागदेवे, क्रिष्णा उपरीकर, ईश्वर कळंबे, राजु बावनकुळे, राजु शक्तीकर, राजेंद्र राखडे, संजय सतदेवे, सुनिल मोगरे, अरुण अंबादे, साहिल हुमणे, लोकेश नगरे, भोजराज वाघमारे, प्रेमसागर गजभिये, फरहान पटेल, विशाल बावनकुळे, अज्ञान राघोर्ते, राजु लुटे, रुपेश खवास, सुभाष तितीरमारे, निरज शहारे, प्रदीप सुखदेवे, सुनिल भोपे, रवि लक्षणे, सौ. किरण पवनकर, सुरेश थोटे, विष्णु कढीखाये, रविंद्र पवनकर, राजेश वासनिक, विद्या साखरे, नरेंद्र साखरकर, सुधिर वहिले, अबरार अहमद, प्रकाश भुरे, लक्ष्मीकांत गभणे, व मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजपातर्फे अजित पवार यांना श्रध्दांजली



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** सामान्य जनतेशी नाळ जोडलेले, राज्याच्या विकासासाठी अखंडपणे झटणारे नेतृत्व राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांचे विमानाला बारामती येथे झालेल्या अपघातात मृत्यू झाला.

अजितदादांची प्रशासनावरची मजबूत पकड, कामाचा अफाट वेग आणि लोककल्याणाचा अखंड ध्यास या साऱ्यांमुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले.

आज भारतीय जनता पार्टी भंडारा जिल्हा तर्फे शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते .

या शोकसभेला भाजपा जिल्हा अध्यक्ष आशु गोंडाने, जिल्हा महामंत्री मयुर बिसेन, भंडारा शहर अध्यक्ष सचिन कुंभलकर, भंडारा नगर परिषद अध्यक्ष मधुरा मदनकर, चंद्रकला भोपे, रुबी चड्डा ,संदीप मेश्राम, हरिचंद मडावी ,,प्रीती ब्राह्मणकर ,श्रद्धा डोंगरे ,रोशनी पडोळे,भाग्यश्री कळंबे ,निलेश गाढवे , ,प्रदीप साठवणे, रवींद्र नेवारे ,शैलेश मेश्राम, पप्पू भोपे ,अक्षय भिवगडे, निमिष डोकरीमारे आदीनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली.

## बळीराम ठोसरे यांचे निधन

**भंडारा :** नगर परिषद, भंडारा चे सेवानिवृत्त कर्मचारी ह.भ.प. बळीराम शिवरामजी ठोसरे (७८) यांचे दीर्घ आजाराने मृत्यू झाले. ते राधारमण भजन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, नातवंड व आप्तपरिवार आहे.

## नाल्यात पडलेल्या एकाचा मृत्यू

**भंडारा :** तालुक्यातील शहापूर जवळील नाल्यात एक व्यक्ति फिट येवून पडला. त्यात त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. राहुल सुखदेव आरके (५५) रा. शहापूर असे मृतकाचे नाव आहे.

मृतक हा एकटाच राहत होता. मुलाच्या मृत्यूनंतर त्याला दारूचे व्यसन जडले होते. तसेच त्याला फिट येत असल्याने कुठेही पडून राहत होता. तो गावाजवळील वाकडा पूलाकडे गेला असता अचानक त्याला फिटचा झटका येवून नाल्यात पडला. त्यात त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

## नायलॉन मांजामुळे हिंगणघाट येथे माजी सैनिक जखमी

**हिंगणघाट, :** नायलॉन मांजाने अनेकांचे जीवघेणे अपघात झाले असून स्वातंत्र्यदिनी वृद्ध माजी सैनिकांचा शहरात अपघात झाला, ते या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत.

सरकारचे वतीने नायलॉन मांजा विक्री व वापरांसंबंधात नियमावली ठरविण्यात आली असली तरीही स्थानिक प्रशासन यासंबंधात कारवाई करीत नसल्यामुळे शहरात विविध ठिकाणी खुलेआम विक्री व वापर दिसून येत आहे, काल सायंकाळी यशवंतनगर येथील माजी सैनिक राजाभाऊ तायडे(७२) हे आठवडी बाजारातून आपल्या मोपेड दुचाकीने परत येत असताना स्थानिक लक्ष्मी टॉकीज परिसरात मांजाचे जाळ्यात अडकून गंभीर जखमी झाले, त्यांचे डोक्याला व गळयाला गंभीर दुखापत झाली, जखमी अवस्थेत येथील सुज्ञ नागरिकांनी त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले.

नायलॉन मांजाचा वापर करण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने बंदी घातली असून वापर करणा-या व्यक्ती व मुलांना ५० हजार रुपये दंड तर विक्री करणा-यास दोन लाख ५० हजार रुपये दंड आकारण्यात येणार असल्याची माहिती प्रकाशित करण्यात आली आहे, या जीवघेण्या मांजाचा तत्काळ वापर बंद करण्यासाठी प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी जनतेद्वारे करण्यात येत आहे.

# महाराष्ट्राचे दादा गेले... जिल्हयात दुखवटयाच्या उमटल्या प्रतिक्रिया

## अजित पवार यांच्या निधनावरील प्रतिक्रिया

### निस्वार्थपणे कार्य करणारे एक प्रभावी नेतृत्व हरवले - राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर



**वर्धा** - महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय श्री. अजितदादा पवार यांच्या अचानक झालेल्या अपघाताने समस्त महाराष्ट्राचे मन हेलावून गेले आहे. राज्य आणि समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणारे एक प्रभावी नेतृत्व आपणा सर्वांचे अजितदादा आपल्यातून निघून गेले, ही अत्यंत वेदनादायी घटना आहे. त्यांचे राज्याच्या जडणघडणीत मोठे योगदान राहिले आहे. प्रशासकीय पातळीवर कार्य करण्याची त्यांची हातोटी अतुलनीय होती. त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा ठसा सदैव स्मरणात राहील. त्यांच्या विचारांने, कर्तृत्वाने आणि सेवाभावाने पुढील पिढ्यांना सतत प्रेरणा मिळत राहील.

ईश्वर आदरणीय अजितदादा यांच्या दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो आणि शोकाकुल परिवारास या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो.

भावपूर्ण श्रद्धांजली

**डॉ.पंकज भोयर**
**राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन**

### महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली -मुनेश्वर



**वर्धा** - उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक विमान अपघाती निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. परखड, स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा आणि रोखठोक भूमिका मांडणारे एक धडाडीचे लोकनेते आपल्यातून हरपले.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) तर्फे विनम्र आदरांजली.

**महेंद्र मुनेश्वर,वर्धा**

### प्रशासनावर पकड व स्वभावातील स्पष्टपणा असलेला महाराष्ट्रातील मोठा नेता हरपला

## खासदार अमर काळे यांनी अजितदादा पवार उपमुख्यमंत्री म.रा. यांचे दुःखद निधनाबद्दल व्यक्त केली शोक संवेदना



**वर्धा** -दि. २८. रोजी सकाळी अजितदादांच्या विमान अपघाताबद्दल बातमी मला कळली. सदर बातमीबाबत मी माहीती घेतली असता अजितदादांचे या विमान अपघातात दुःखद निधन झाल्याचे कळले. ही घटना घडून इतका वेळ झाला पण अजितदादांच्या विमानाला अपघात होऊन अजितदादांचे या अपघातात निधन झाले हे अजून पर्यंत मन मानायला तयार नाही व यावर अजुन पर्यंत विश्वासबसत नाही. पण अजितदादा पवार यांचे निधनामुळे महाराष्ट्र राज्याचे फार मोठे नुकसान झालेले आहे. प्रशासनावर पकड असलेला व स्वभावातील स्पष्टपणा असलेला नेता म्हणजे अजितदादा पवार होय. विधानसभेत मी त्यांचेसोबत १३ वर्षे काम केले. विधानसभेत राजकीय व्यक्तीचा वावर कसा असावा व आपल्या राजकीय शक्तीचा वापर कसा करावा हे मला अजितदादांनी वारंवार शिकवीले. त्यांच्या राजकीय कारकीर्दीबद्दल व धडाडीबद्दल मला शब्दात वर्णन करता येणार नाही.

माझे बंधू सलील देशमुख यांची तब्येत पहायला अजितदादा पवार नागपूरला आले होते. त्यावेळी तेथे त्यांचेशी भेट झाली होती व हीच शेवटची भेट ठरली. अजितदादा पवारांच्या बाबतीत अनेक आठवणी आहेत. परंतु त्यातील एक महत्वाची आठवण म्हणजे मी प्रथमत:च आमदार झाल्यानंतर माझ्या आर्वी मतदार संघात प्रकल्प ग्रस्तांचा प्रचंड लढा सुरु होता व त्यांच्या मागण्या संदर्भात मी विधानसभेत लक्षवेधी लावली होती. दादांनी माझ्या मागणीला प्रतिसाद देऊन प्रकल्पग्रस्तांकरीता रु. ५ कोटी तात्काळ मंजूर केले. दादा आपल्याला सोडून गेले हे मन मानायला तयार नाही. शेवटी नियतीचा खेळ हा कुणालाच कळला नाही. जे घडले ते मान्य करावेच लागेल. दादांच्या या दु:खद निधनाबद्दल मी, माझा परिवार व माझ्या मतदार संघातील संपूर्ण जनतेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली.

### कणखर आणि लोकाभिमुख नेतृत्व हरपले -देशमुख



**वर्धा** - राज्याचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्राच्या राजकारणातील कणखर आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झाला आहे. सरळ मार्गी विचार, स्पष्ट शब्दांत भूमिका मांडण्याची शैली, वेळेचे काटेकोर पालन आणि निर्णयक्षम नेतृत्व ही त्यांची ओळख होती. अजितदादा पवार यांचे आमच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे कौटुंबिक संबंध होते. वर्ध्याच्या दौऱ्यावर आले असता ते आवर्जून आमच्या निवासस्थानी भेट देत आणि सर्वांची आपुलकीने विचारपूस करत. त्यांच्या कार्यपद्धतीतील धडाका आणि कोणतेही काम तात्काळ मार्गी लावण्याची हातोटी आम्ही अगदी जवळून अनुभवली आहे. दादांचे अकाली जाणे हे केवळ एका कुटुंबाचे नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे मोठे नुकसान आहे. असा धडाडीचा आणि कामाचा आवाका असणारा नेता पुन्हा होणे नाही. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आणि नेतृत्वाची उणीव नेहमीच जाणवत राहील.

मी व माझ्या कुटुंबाच्या वतीने या थोर लोकनेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या दुःखद प्रसंगी पवार कुटुंबियांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती मिळो, ही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

**समीर**
**सुरेशराव देशमुख**

## रणजित दोन दिवसाच्या मुक्कामी ये, दादांचे ते शब्द माझ्यासाठी शेवटचे ठरले - ना.रणजित कांबळे

### दादांच्या निधनाने माझी व्यक्तिगत हानी विकाससाठी पक्ष, गट न पाहणारा नेता राज्याने गमावला



**वर्धा, :** आजची सकाळ ही मला अतिशय सुन्न करून गेलीय. सकाळी अजित दादांच्या निधनाचे वृत्त कळताच माझे मन हेलावून गेले.२१ ऑगस्ट २०२५ रोजी दादांची आणी माझी हिंगणघाट बाजार समितीत झालेली शेवटची भेट. या भेटीत दादांचा तब्बल पाच तास सहवास लाभला. यावेळी बारामती येथे शेती बद्दल आधुनिक एआय तंत्रज्ञान बद्दल दादांनी उत्तम मार्गदर्शन दिले तेव्हा दादांनी मला रणजित दोन दिवसांच्या मुक्कामाने बारामतीला ये मी सोबत राहील आणी शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानची माहिती जाणून घे असा सल्ला दिला होता. दादांच्या निधनाचे वृत्त कळल्यावर हे शब्द सकाळपासून माझ्या कानात येत आहे.विधिमंडळात पंचवीस वर्ष आम्ही सोबत काम केले.अजित दादा नेहमीच माझ्यासाठी मार्गदर्शक होते. सकाळी सात वाजता मंत्रालयात सामान्य नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध असणारे महाराष्ट्राचे हे एकमेव नेते होते हे मी अनुभवले आहे. मंत्रालयातील त्यांच्या कर्मचाऱ्यांना त्यांची सकाळी लवकर यायची सक्त ताकीद होती.सकाळी सात वाजतापासून आपल्या कामात असणारा नेता आज गमावला आहे.त्यांच्या निधनाने आज माझे मोठे व्यक्तिगत नुकसान झाले असून राज्याचेही मोठे नुकसान झाले आहे. अशी संवेदना राज्याचे माजी मंत्री, कॉंग्रेस नेते रणजित कांबळे यांनी व्यक्त केलीय.

रणजित कांबळे पुढे म्हणाले की, अजितदादा पासून मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. प्रशासन कस चालवायचं हे मी दादांपासून शिकलो. मी राज्यमंत्री असतांना दादा माझ्या खात्याचे कॅबिनेट मंत्री होते. मी अनेक कॅबिनेट मंत्र्यांच्या हाताखाली काम केल, काही पण राज्यमंत्री यांना विचारात घेत होते तर काही राज्यमंत्री यांना विचारात घेत नव्हते पण अजितदादा हे नेहमीच राज्यमंत्री यांना प्रत्येक बैठकीला बोलवत होते.एका दिवसात जर दहा बैठक असल्या तर त्या दहाही बैठकीचे पत्र दादा हे राज्यमंत्री यांना पाठवत असून त्यांना बैठकीला बोलवत होते. एवढच नव्हे तर एखाद्या बैठकीत राज्यमंत्री यांनी कोणता निर्णय घेतला तर त्या निर्णयाला ते होकार देत अधिकाऱ्यांना सूचना देखील करत होते. राजकारणातला स्पष्ट, अभ्यासू वक्ता आज आम्ही गमावला आहे.कोणत्याही आमदाराला आपला मतदारसंघ कसा असावा हे जर शिकायचे असेल तर त्यांनी बारामतीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावे.

अजित दादा यांनी विकास कामांसह शेतीवर सुद्धा अनेक प्रयोग केले. ऑगस्ट महिन्यात हिंगणघाट बाजार समितीत अजितदादा आले असता त्यांच्याशी बारामती येथे शेती बाबत एआय तंत्रज्ञान बाबत चर्चा केलीय त्यावेळेस दादांनी परिसरातील शेतकऱ्यांना हे तंत्रज्ञान समजून देण्यासाठी बारामतीला पाठविण्याच्या सूचना केल्या होत्या. एवढच नव्हे तर शेतकऱ्यांच्या राहण्यासह, जेवणाची व्यवस्था करणार असल्याची ग्वाही सुद्धा दादांनी मला दिली होती. पक्षीय मतभेद बाजूला सारून विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवत काम करणारा नेता आज आपण गमावला आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो व पवार कुटुंबाला हे दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर प्रदान करो हीच प्रार्थना.

## महाराष्ट्राचे एक दमदार नेतृत्व महाराष्ट्राने गमावले -कांबळे



**वर्धा** -महाराष्ट्राचे एक दमदार नेतृत्व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार यांचा आज विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.ही वार्ता मन सुन्न करणारी आहे. राज्याच्या व राष्ट्राच्या राजकारणात अजित दादाच्या असे अकाली जाण्याने जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणारी नाही

तथागत त्यांच्या परिवारला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो व त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच बुद्ध चरणी यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**विलास कांबळे**
**जिल्हा उपाध्यक्ष, आरपीआय (आठवले गट)**

## दिलदार आणि करारी व्यक्तीमत्वाचे धनी असल्याचे अजितदादा यांना मी प्रत्यक्ष अनुभवले



**वर्धा** -महाविकास आघाडीच्या शासनामध्ये उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री असताना जिल्हा परिषदेच्या कोरोना काळातील नागपूर विभागीय बैं'कीत अंगणवाडी बांधकामाकरीता ८.५० लाखाची तरतूद अपुरी असल्याचे लक्षात आणून देताच केवळ दहा दिवसात वाढीव तरतुदीचा जी. आर. राज्यात लागू केला, जि. प. च्या आर्थिक बजेटमध्ये कात्री लावल्यानंतर विभागीय आयुक्तांच्या बैं'कीत अजितदादांचे समक्ष वर्धा जिल्हा परिषदेच्या बजेटमध्ये भरीव तरतूद देण्याचा प्रस्ताव मांडत असताना त्यांची ती कणखर भूमिका मी प्रत्यक्ष अनुभवली. त्यांच्या अचानक जाण्याने महाराष्ट्राचे अर्थखाते सुन्न झाल्यासारखे वाटते. या दु:खद प्रसंगी पवार कुटुंबियांना ईश्वर धिर देवो, अशी अजितदादा यांना माझी जि. प. च्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

**सरीता गाखरे,**
**माजी जि. प. अध्यक्ष, वर्धा.**

## शिवसेनेच्या वतीने अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण



**वर्धा** -राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख नेते अजितदादा पवार यांचे विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाले.त्यांना जिल्हा शिवसेनेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शिवसेनेच्या प्रतोद,प्रवक्त्या,विदर्भ संपर्क प्रमुख आ.मनीषाताई कायंदे

पक्षाच्या नियोजित कार्यक्रमानुसार संघटनात्मक बैठकीला जिल्हा दौऱ्यावर होत्या स्थानिक विश्रामगृह येथे मुक्कामी असतांना दि. २८ जानेवारी रोजी सकाळी बारामती येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख अजितदादा पवार यांचे विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाल्याचे कळताच पक्षाचे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आले व स्थानिक विश्रामगृह येथे शोक सभेचे आयोजन करून स्व.अजितदादा यांना शिवसेनेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.आमदार मनीषाताई कायंदे यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या शोक सभेला लोकसभा संपर्क प्रमुख राज दीक्षित,सह संपर्क प्रमुख श्रीकांत मिरापूरकर, लोकसभा संघटक रविकांत बालपांडे, जिल्हाप्रमुख राजेश सराफ व प्रशांत शहागडकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर,उपजिल्हा प्रमुख मिलन गांधी, तक्रार निवारण समितीचे प्रमुख सुरेश पट्टेवार,शहर प्रमुख शार्दूल वांदिले,शहर समन्वयक धरम शेंडे,संजय गांधी निराधार समितीचे सदस्य नितीन देशमुख, मनोज भूतडा,सुयोग नवघरे,राजू चांदोरिया, महिला आघाडी शहर प्रमुख मयुरी गांधी, उपशहर प्रमुख रंजना पट्टेवार,कविता भूतडा,महिला आघाडी माजी जिल्हाप्रमुख सविता पुरी, महिला आघाडी उप शहर प्रमुख अगस्ता शेंडे आदींची उपस्थिती होती.

## आमचा देव हरपला....आमचा आधार हरपला....

### आजचा दिवस काम करणाऱ्या कार्यकर्त्यासाठी काळा दिवस



**आर्वी :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ,अर्थमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा अजीतदादा पवार यांच्या विमानाला आज झालेल्या दुर्घटनेत आज दादा सर्वांना सोडून गेले.त्यांच्या मृत्युची बातमी ही अंगावर काटा आणणारी होती कार्यकर्त्यांना आपल्या भावना व्यक्त करताना अश्रू अनावर झाले होते,

आर्वी येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयात श्रद्धांजली वाहताना दादा आपल्यात नाही हे कोणी मान्यच करायला तय्यार नव्हते दादा आपल्या कार्यकर्त्यांसाठी आपल्या लोकांसाठी या देशासाठी एक अमुल्य ठेवा सोडून गेले आहेत.या दुःखातून सावरणे कठीण असुन यामुळे देशाची, राज्याची मोठी हानी झाली असुन आपल्या भावना आता शब्दांत व्यक्त होणे अशक्य आहे.दुःख दायी वातावरणात भावना व्यक्त केल्या यावेळी शेकडो पदाधिकारी कार्यकर्त्यांनी दादांच्या प्रतिमेला हारार्पण पूजन करून मौन पाळून श्रद्धांजली वाहिली.

## नगरपरिषद पुलगाव येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण



**पुलगाव:** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान दुर्घटनाग्रस्त मध्ये दुःखद निधनामुळे संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर, पुलगाव नगरपरिषदेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

नगरपरिषद कार्यालयात आयोजित या शोकसभेत नगरपरिषदेचे उपाध्यक्ष दीपक आहुजा यांनी अजितदादांच्या फोटो ला हार व पुष्प वाहून आदरांजली दिली

कार्याचा गौरव केला. राज्याच्या विकासात, विशेषतः ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि आर्थिक नियोजनात त्यांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवर आणि कर्मचाऱ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत नेत्याला आदरांजली वाहिली.

याप्रसंगी प्रामुख्याने उपाध्यक्ष दिपक आहुजा, बांधकाम सभापती शांतीदेव खैरकार अमरदीप देशमुख, सुहास नागदिवे, रवी केसरवानी, स्वप्नील रामटेके,यांच्यासह प्रशासकीय अधिकारी सुमन सोमन,बांधकाम अभियंता प्रज्वल गुडघे, अनील अबांदे, शुभम गायकवाड, राहुल ढोबले, अभिजीत लोखंडे,शरद चौगुले,संजय वानखेडे, सचिन करवाडे वसंत चुटे, शंकर शंभरकर सतिश अवथे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच धर्मेंद्र अबादेसर व सुनील ब्राह्मणकर, यांनी दोन शब्द बोलून यांनीही अजितदादांच्या आठवणींना उजाळा देऊन श्रद्धांजली अर्पण केली.

अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कणखर आणि शिस्तप्रिय नेतृत्व हरपल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पुलगाव नगरपरिषदेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. या शोकसभेला नगरपरिषदेचे विविध विभागांचे कर्मचारी आणि शहरातील दिलिप वलीवकर, समीर जगनाडे ,शेख नाजीम, देवानंद येसनकार ,सनी ढोमणे, लल्लू वर्मा, नागरिक उपस्थित होते.

